जाहीर नोटीस

खालील तपशिलात नमूद केलेले दस्तावेज **श्री. तुषार श्रीरंग शिंदे रा. नवीन बस स्थानक जवळ, चिरंतन कॉम्प्लेक्स, आंबेडकर चौक, भीमनगर, चिंचवड, पुणे- ४११०३३** यांचे ताब्यातून हरविले आहेत व गहाळ झाले आहेत व अथक प्रयत्न करूनही सदर दस्तावेज हे मिळून आले नाहीत. तरी सदर दस्तावेज हे कोणासही मिळाल्यास अथवा त्याबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे आत खाली दिलेल्या पत्ता व मो. नं वर संपर्क करून सदर मूळ दस्तावेज वा माहिती द्यावी असे नम्र आवाहन असे.

हरवलेल्या दस्तावेजांचा तपशील : मे. लुनावत गादिया असोसिएटस भागीदारी संस्थातर्फे भागीदार श्री. प्रकाश हस्तीमल गादिया आणि श्री. विजयकुमार माणिकचंद लुनावत यांनी श्री. श्रीकांत शांताराम दळवी आणि सौ. शशिकला श्रीकांत दळवी यांचे हक्कात लिहून दिलेले दि. ३१/१२/२००२ रोजीचे मा. दुय्यम निबंधक हवेली क्र. १४ यांचे कार्यालयामध्ये अनु. क्र. ७७२७/२००२ अन्वये नोंदणीकृत झालेले करारनामा मूळ दस्त, मूळ पावती व इंडेक्स टू सह. **सही/-**

ॲड. अजित बापू खामकर
ऑफिस नं. ०३ माणिकराज पार्क, हेरिटेज प्लाझा समोर, पिंपरी-चिंचवड लिंक रोड, पुणे- ३३.
मो.नं. ८६६८४९६७५७

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्ट मध्ये नमुद केलली मिळकत ही पुर्वी **सौ. नेहा मनिष श्रोते, श्री. मनिष रामचंद्र श्रोते व श्री. सुरेश कुमार गुप्ता** ह्यांची स्वकष्टार्जित मालकी वहीवाटीची मिळकत होती. यापैकी श्री. मनिष रामचंद्र श्रोते यांचे दिनांक ०५.०४.२०१७ रोजी ऑस्ट्रेलिया येथे निधन झालेले आहे. त्यांच्या निधनानंतर त्यांना त्यांची पत्नी सौ. नेहा मनिष श्रोते व सौ. शोभा रामचंद्र श्रोते हे वारस आहेत. सदर वारसापैकी सौ. शोभा रामचंद्र श्रोते व श्री. रामचंद्र मोतीराम श्रोते यांनी दिनांक ०३.११.२०१७ रोजीच्या बक्षीसपत्रानुसार सदर मिळकतीमधील त्यांचा हिस्सा श्रीमती नेहा मनिष श्रोते यांना दिलेले आहे. सदरचे बक्षीसपत्र हे सह दुय्यम निबंधक हवेली २१ यांच्या कार्यालयात अनुक्रमे १४२३४/२०१७ अन्वये रितसर नोंदविलेले आहे.

तरी सदर मिळकतीवर कोणाचाही, कसलाही, कोणत्याही प्रकारचा बोजा, विक्री करार, बक्षिस, वाटणी, पोटगीचा हक्क, अदलाबदल, गहाण, दान, लिज, लिन, हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी सदर जाहीर **नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत** खालील पत्त्यावर समक्ष भेट घेऊन मूळ कागदपत्रानिशी खात्री पटवून द्यावी. सदर मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, बोजारहित व निर्जोखमी आहे व त्यावर कोणाचाही कसलेही प्रकारचा हक्क व अधिकार नाही व असल्यास त्यांनी तो जाणीवपुर्वक समजून उमजून सोडून दिलेला आहे असे समजण्यात येईल. नंतर कोणाचीही कसलीही तक्रार/ हरकत चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन:- तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका हवेली जि. पुणे येथील मे. सब रजिस्ट्रार साहेब हवेली १ ते २७ यांचे कक्षेतील गाव मौजे बालेवाडी येथील स. नं. ३१/८, ३१/७/बी, ३१/६/२२, ३१/५/१ या मिळकतीवरील बांधलेल्या फावलोसा व फावलोसा को -ऑप. हौसिंग सोसायटी मधील इमारत क्र/विंग नं. अे, मधील नवव्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ९०२ यांसी कारपेट १०२६ चौ. फुट तसेच टेरेस यांसी क्षेत्र १८६ चौ. फुट तसेच कव्हर्ड कार पार्किंग नं. १४ यांसी क्षेत्र १०० चौ, फुट हि मिळकत. **सही/-**

पुणे, दि. ०५/०४/२०२४

ॲड. राहुल सावरकर
ॲड. प्रमोद पवार ॲन्ड असोसिएट्स करीता
Off. Office No. 1, CTS No. 286 / 287, Narayan Peth, Pune 411030. **Contact No. 020-24488064, 7588128064, 7620411252,**

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली संपूर्ण मिळकत त्यांचे विद्यमान मालक **मे. भानजी नानजी ट्रस्ट तर्फे ट्रस्टीज सौ. रेखा रमेशचंद्र भाटे व रमालक्ष्मी रमेशचंद्र भाटे, ज्योती पी. ठक्कर, विजया रोहित दैया, अमिश अशोक ठक्कर,** सर्व रा. पुणे असून त्यांनी सदर मिळकतीचे पणनयोग्य हक्क तपासण्यास आम्हांस सांगितलेवरून आम्ही पणनयोग्य हक्क तपासणीकामी सदर नोटीस देत आहोत. तरी सदर संपूर्ण मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी व बोजारहित आहे. सदर मिळकतीवर वरील मालकांव्यतिरिक्त इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा गहाण, दान, लिन, लिज, जप्ती, चोळीबांगडी, करार मदार, या इतर कोणत्याही प्रकारचे हक्क हितसंबंध असल्यास अथवा सदर व्यवहारास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी आपली लेखी हरकत संबंधित सर्व कागदपत्रांसह प्रस्तुत नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांत आमचे खालील नमुद पत्त्यावर लेखी पोहोचवावी व स्वतःचे कथित हरकतीबाबत आमची खात्री पटवून द्यावी अन्यथा कोणाचीही कसलीही हरकत नसल्याचे समजून आम्ही शोध पूर्ण करून पणनयोग्य हक्काबाबत दाखला देऊ व पुढील प्रक्रिया पूर्ण करू, याची नोंद घ्यावी. सबब ही नोटीस.

परिशिष्ट : मिळकतीचे वर्णन : तुकडी-पुणे-पोट तुकडी तालुका-हवेली पुणे शहर जिल्हा पुणे मे. सब रजिस्ट्रार पुणे यांचे कार्यक्षेत्रातील तसेच पुणे महानगरपालिकेचे हद्दीतील मौजे भवानी पेठ येथील नगर भूमापन क्र.६२ यांसी एकुण क्षेत्र ४४७.३३ चौ.मी ही जमिन मिळकत यांसी चतु:सिमा : **पुर्वेस :** नगर भूमापन ६४ ही मिळकत, **दक्षिणेस :** सरकारी रस्ता, **पश्चिमेस :** नगर भूमापन नं.६१ मिळकत, **उत्तरेस :** रस्ता. येणेप्रमाणे चतु:सीमापूर्वक वर्णनाची मिळकत त्यातील वहिवाटीचे इजमेंटचे तसेच तदंगभूत वस्तू व हक्क अधिकारांसह मिळकत दरोबस्त.

पुणे, दिनांक : ५ / ४ /२०२४ **Sd/-**

Adv. Mr. Manish S. Desai
Office at- 311, 3rd floor, Kamla Arcade, opposite to BalGandharva J.M. Road, Shivajinagar, Pune-411004. Mob. 7887801111 E-mail: advmsd1@gmail.com

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने जाहीर करण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही **शाहनवाज शफिक शेख आणि झेबा शाहनवाज शेख** यांच्या मालकी हक्काची व वहीवाटीची आहे तसेच सदर मिळकत त्यांनी आमचे अशिल मे. श्रीराम हाऊसिंग फायनान्स लि. कडे गहाण ठेवण्याचे ठरविले आहे. परंतु सदर मिळकतीचा खालील नमुद मूळ दस्त हरवले/गहाळ झाले आहेत.

श्री. राजराम जनार्दन माळी व इतर व श्री. अमित किसन पानसरे यांचेमधील मूळ खरेदीखत दस्त नं. ६०२०/२००३ हवेली नं. १४ दि. २३/०९/२००३ त्यांचे सूची व पावतीसह

तरी सदर मिळकत वा मूळ कागदपत्रे कुठल्याही बँक अथवा वित्तीय अर्थसंस्था अथवा इसमांकडे कर्ज घेण्याकरिता किंवा इतर कोणत्याही कारणास्तव गहाण ठेवलेली नाही. तरी सदर मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा गहाण, दान, लीन, लीज, करार, मदार, बक्षीस, वारसा वा इतर कोणत्याही प्रकारे, कसलेही हक्क हितसंबंध, अधिकार असल्यास किंवा सदर दस्ताची मुळप्रत जमा असल्यास अशा व्यक्तींनी **प्रस्तूतची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत** अस्सल कागदपत्रांनिशी आमची तशी खात्री पटवून द्यावी व त्यापश्चात कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही.

मिळकतीचे वर्णन

परिशिष्ट (मिळकतीचे वर्णन) : तुकडी पुणे, पोटतुकडी, ता. हवेली, मे. सब रजिस्ट्रार हवेली यांचे हद्दीतील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील गाव मौजे किवळे येथील मिळकत सर्वे नं. ६१ हिस्सा नं. १ ते १४ यासी क्षेत्र ०० हे ८५ आर यापैकी शाहनवाज शफिक शेख आणि झेबा शाहनवाज शेख यांचे मालकी हक्काचे क्षेत्र १६७ चौ.मी. हि मिळकत. येणेप्रमाणे जाहीर नोटीस. **सही/-**

ॲड. गणेश चव्हाण
ऑफिस नं. ३ पहिला मजला, नवमहाराष्ट्र हाऊस, शनिवार पेठ, पुणे - ४११०३०. **मो. नं. ९८६००९७६९७**

बारामती येथील मे. जे. पी. दरेकर साो., जिल्हा न्यायाधीश - १, बारामती, जि. पुणे यांचे न्यायालयात

दि. कि. अर्ज नं. ४१/२०२४
निशाणी : ०६

जाहीर नोटीस

१) कु. गौरी गणेश पवार, वय : १५ वर्षे, धंदा : शिक्षण, अज्ञान म्हणून त्यांचेतर्फे **अ.पा.क. आई श्रीमती सिमा गणेश पवार,** रा. २०२, ओसवाल पंचायत धर्मशाळा समोर, नाना पेठ, पुणे ४११००२ **... अर्जदार**

विरुद्ध

कोणी नाही ... जाब देणार

ज्याअर्थी अर्जदार यांनी या न्यायालयात मावनर ॲन्ड गार्डियनशिप ॲक्ट कलम ८ अन्वये खालील नमूद मिळकत इंदापूर, जि. पुणे येथील तु. पुणे पो. तु. बारामती मे. दु. निबंधक इंदापूर यांचे हद्दीतील गाव मौजे इंदापूर, जि. पुणे येथील व इंदापूर जिल्हा व जिल्हा परिषदेचे वाढीव हद्दीतील मिळकत सर्व्हे गट नं. ४५/१/अ/२ येणेप्रमाणे अर्जदाराचे ताब्यात असलेले क्षेत्र मिळकत विक्री करणेस योग्य तो आदेश मिळणेसाठी अर्जदाराने या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

ज्याअर्थी, या मे. कोर्टाचे स्थळसीमेत अर्जदार यांचे नावावरील मौजे इंदापूर जि. पुणे मिळकत खालीलप्रमाणे-

अ. क्र.	गट नं.	हे. आर.	रु. पैसे
१	४५/१/अ/२	२=०२	०३=२८

यांसी चतु:सिमा पुढीलप्रमाणे - **पुर्वेस :** जमीन गट नं. ४५/१ गणेश मोरे व ४०/अ/१, **पश्चिमेस :** जमीन गट नं. ४५/१/अ/१/ब/२, **दक्षिणेस :** जमिन गट नं. ४५ पैकी संपत फलफले, प्रदिप जगताप, जे. के. जगताप यांची जमिन, **उत्तर :** जमिन गट नं. ४५/१/अ/१/ब/२ सुवर्णा बालगुडे व रस्ता, पुष्पा चौधरी व श्रीकांत चौधरी यांची जमिन.

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक शेतजमिन त्यातील दगड, धोंडे, माती ताली, झाड, झाडोरा इत्यादी तदंगभूत वस्तुसहित.

अर्जदाराचे ताब्यात असलेली मिळकत विक्री करणेस योग्य तो आदेश मिळणेसाठी अर्जदाराने या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी कोणास सदर अर्जाविरूध्द हरकती दाखवण्याकरिता, आपले म्हणणे मांडणे असल्यास, हया जाहीरनाम्याचे तारखेपासून प्रकरणाचे नेमल्या तारखेपर्यंत त्याने या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदर मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदर अर्जदार यांचे हक्काबरदल लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला उक्त क्षेत्राची जमीन विक्री करणेस परवानगी प्रमाणपत्र देईल.

आज दि. २६/०३/२०२४ रोजी सदरचा जाहीर नोटीस सही व न्यायालयाच्या गोल मुद्रेसह दिली असे.

पु. ने. ता. २६/०४/२०२४ हुकूमावरून,
शिक्का सही/-
अधिक्षक,
अति. जिल्हा व सत्र न्यायालय, बारामती, पुणे.

2nd call Tender Notice

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (SRM E-Tender) from **Registered Contractors** on Mahatransco SRM E-Tendering Website https://srmetender.mahatransco.in for the following works.

Sr. No.	RFx No. & Description of Work	Due date & Time (Hrs) for online submission of Tender
1	**RFX No. 7000030430. Tender No. EE/ 500 KV/ HVDC TL (O&M)/ DN/ RNGR/ Tech/ T-04/2023-24**	
	2nd call for Hiring of Tata Sumo/Mahindra Bolero vehicle along with driver with fuel for 500kV HVDC TL(O&M) Sub-Division, Padghe for F.Y. 2024-25	**Download of tender documents Date :** 06.04.2024 to 12.04.2024 up to 23:59 Hrs.

Estimated Cost (Rs.)	EMD (Rs.)	Tender Fee (Rs.)	Closing Date	Techno Commercial bid opening Date
5,99,878.00/- (Inclusive of taxes)	5,998.78/-	Rs.590.00/ - (Rs. 500+ 18% GST)	12.04.2024 at 23:59 hrs.	13.04.2024 at 11:00 Hrs. (If Possible)

Note :- All new interested contractors are mandated to get registered on website https://srmetender.mahatransco.in for new vendor registration.

Contact Person: The Assistant Engineer (O), 7775934906.
For further details visit our website http://mahatransco.in/

1. Relevant portions of the Tender which the tenderer has to fill online would be available on aforesaid website.
2. Tender documents can be downloaded online from aforesaid website.
3. Eligible contractor agencies should submit their bid well in advance instead of waiting till last date.

MSETCL will not be responsible for non-submission of Bid due to any website related problems.

Sd/-
Executive Engineer
500KV HVDC TL (O&M) Division, Rajgurunagar

ICICI Home Finance | **कॉर्पोरेट कार्यालय :** आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, आयसीआयसीआय एचएफसी टॉवर, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०५९, भारत.
शाखा कार्यालय : कार्यालय नं. १०१, पहिला मजला, फॉर्च्युन बिझनेस सेंटर, ॲम्बियन्स हॉटेलजवळ, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे-४११ ०५७

(नियम ८ (६) च्या तरतुदी पाहा)

अचल मालमत्तांच्या विक्रीसाठी सूचना

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स ॲण्ड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा, २००२ तसेच त्यासह वाचा सिक्युरिटी इंटरेस्ट (इन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८ (६) अंतर्गत तरतुदींच्या अनुसार अचल मालमत्तांच्या ई-लिलाव विक्रीकरिता सूचना.

याद्वारे आम जनतेला आणि विशेषतः कर्जदार व हमीदार यांना सूचित करण्यात येते की, खालीलप्रमाणे नमूद केलेल्या मालमत्ता या संरक्षित धनको यांच्याकडे तारण ठेवण्यात आल्या आहेत, तसेच त्यांच्यावर धनको यांचा भार आहे आणि त्यांचा **प्रत्यक्ष ताबा** आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड यांच्या प्राधिकृत अधिकारी यांनी घेतला आहे आणि त्यांची विक्री ''जसे आहे जिथे आहे'', ''जसे आहे जे आहे'' तत्त्वानुसार आणि खालीलप्रमाणे देण्यात आलेल्या तपशिलाच्या अनुसार करण्यात येणार आहे.

अ. क्र.	कर्जदार/सहकर्जदार/ हमीदार/कायदेशीर वारसदार यांचे नाव आणि कर्ज खाते क्रमांक	संरक्षित मालमत्तेचा तपशील त्यावर असलेल्या भारांसह असल्यास	येणे असलेली रक्कम	राखीव किंमत / इसारा रक्कम ठेव	मालमत्तेच्या पाहणीची तारीख आणि वेळ	लिलावाची तारीख आणि वेळ
(ए)	(बी)	(सी)	(डी)	(ई)	(एफ)	(जी)
१	ओमकार विलास कंक (कर्जदार), वैशाली विलास कंक (सहकर्जदार), कर्ज खाते क्र. : एलएचपीडब्ल्यूके ००००१३५८७७८ व एलएचपीडब्ल्यूके ००००१३५८२७१	फ्लॅट क्र. ४०१, चौथा मजला, बी विंग, कपिल ड्रीम्स, सीटीएस क्र. १७८, १७९, १८० व १८१, गाव ठाणा यासी, विभाग पुणे, प्लॉट डिव्हिजन, ता. हवेली, मेहे. उपनिबंधक साहेब, हवेली, जिल्हा परिषद, पुणे यांच्या कार्यकक्षेत व तालुका पंचायत समिती, पुणे येथील.	रु. ५१,४३,२०१/- दि. २८ मार्च २०२४	रु. ३१,०६,३५०/- / रु. ३,१०,६४०/-	०६ मे २०२४ रोजी स. ११.०० ते दु. ३.००	१५ मे २०२४ रोजी दु. २.०० ते दु. ३.००

ऑनलाइन लिलाव प्रक्रिया ही आमची लिलाव एजन्सी **ग्लोब टेक** यांचे संकेतस्थळ (यूआरएल लिंक - https://BestAuctionDeal.com) यांच्या माध्यमातून घेण्यात येईल. तारणदार/सूचना देण्यात येत आहे की, त्यांनी एकूण येणे असलेली रक्कम अधिक त्यावरील व्याज आणि अन्य शुल्क दिनांक **१४ मे २०२४ रोजी संध्याकाळी ०५.०० पर्यंत** अदा करावे. संरक्षित मालमत्तांची विक्री वरीलप्रमाणे नमूद केलेल्या वेळापत्रकाच्या अनुसार करण्यात येणार आहे.

प्रस्तावित बोलीदार यांनी ईएमडी रक्कम आरटीजीएस/डीडी यांच्या माध्यमातून (रकाना ई चा संदर्भ घ्यावा) **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, कार्यालय क्र. १०१, पहिला मजला, फॉर्च्युन बिझनेस सेंटर, ॲम्बियन्स हॉटेलजवळ, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे-४११ ०५७** येथे **दि. १४ मे २०२४ रोजी संध्याकाळी ४.००** वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी अदा करावी. कृपया नोंद घ्यावी की, प्रस्तावित बोलीदार वरीलप्रमाणे नमूद केलेल्या वेळापत्रकाच्या अनुसार आणि वेळेत आपली बोली सादर करू शकणार नसतील तर निविदा प्रपत्र **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड, कार्यालय क्र. १०१, पहिला मजला, फॉर्च्युन बिझनेस सेंटर, ॲम्बियन्स हॉटेलजवळ, कस्पटे वस्ती, वाकड, पुणे-४११ ०५७** येथे **दि. १४ मे २०२४ रोजी संध्याकाळी ५.००** वाजेपर्यंत किंवा त्यापूर्वी सादर करता येईल. ईएमडी रकमेच्या संदर्भात डीडी हा राष्ट्रीयीकृत बँकेचा/शेड्युल बँकेचा आणि ''**आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड-लिलाव**'' यांच्या नावे आणि **पुणे** येथे देय असावा.

वरीलप्रमाणे नमूद केलेल्या संरक्षित मालमत्तांच्या संदर्भात पाहणी करण्यासाठी यापुढील अधिक स्पष्टीकरणासाठी तसेच लिलावाच्या संदर्भात अटी आणि शर्ती यांची माहिती जाणून घेण्यासाठी आणि निविदा सादर करण्याच्या संदर्भातील अधिक माहिती जाणून घेण्यासाठी कृपया **आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड-९९२०८०७३००** किंवा आमचे विक्री आणि विपणन भागीदार **नेक्सझेन सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड** यांच्याशी संपर्क साधावा.

कोणतीही किंवा सर्व बोली कोणतेही कारण न देता फेटाळून लावण्याचा अधिकार प्राधिकृत अधिकारी यांनी राखून ठेवला आहे. विक्रीच्या संदर्भातील सविस्तर अटी आणि शर्ती जाणून घेण्यासाठी कृपया https://www.icicihfc.com/ येथे भेट द्यावी.

दिनांक : ०६ एप्रिल २०२४
स्थळ : पुणे

प्राधिकृत अधिकारी
आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेल्या **मिळकतीचे मालक श्री. राजेश तिवारी,** रा. फ्लॅट नं. २७, गुलमोहर गार्डन, लेन नं. ०७, कोरेगाव पार्क, पुणे - ४११००१ व आमचे अशीलांमध्ये खाली परिशिष्टमध्ये नमूद केलेल्या मिळकतीच्या खरेदी-विक्रीसंदर्भात बोलणी सुरू असून, सदर मिळकत निर्वेध व निजोखमी व बोजाविरहित असल्याचा भरवसा त्यांनी आमच्या अशिलास दिला आहे. तरी सदर मिळकतीवर कोणाचाही, कोणत्याही स्वरूपाचा गहाण, दान, लीन, लीज, बक्षीस, ताबा, पोटगी, दावा, साठेखत, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, अधिकार असल्यास त्यांनी **ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत** आमच्याकडे समक्ष येऊन मूळ कागदपत्रानिशी त्याबाबत आमची खात्री पटवून द्यावी अन्यथा असा कोणताही हक्क हितसंबंध वा बोजा नाही व असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे समजून आमचे अशील पुढील व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कोणाचीही, कसलीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

पुणे महानगरपालिकेच्या स्थानिक हद्दीतील आणि सब-रजिस्ट्रार, हवेली १ ते २७ च्या अधिकारक्षेत्रात असलेले गाव मौजे वडगाव शेरी पुणे येथील ए) स. नं. ३९/४/१ए/१ क्षेत्र ६७० चौ. मी. बी) स. नं. ३९/४/१०/२ क्षेत्र ४६४ चौ. मी. सी) स. नं. ३९/४/१ ए/३ क्षेत्र ४६५ चौ. मी. डी) स. नं. ३९/४/१०/४ क्षेत्र ३७१ चौ. मी. इ) स.नं. ३९/४/१ ए/५ क्षेत्र ४३.७५ चौ. मी. असे एकूण क्षेत्र २०१४ चौ. मी. व या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या ''एस्प्री ॲमिनन्स'' या प्रोजेक्ट आणि एस्प्री ॲमिनन्स को-ऑप.हौसिंग सोसायटी लि. मधील बिल्डींग नं. - ए मधील विंग नं- ए मधील पाचव्या मजल्यावरील फ्लॅट नं. ५०४ यासी कार्पेट क्षेत्र ३२.४१ चौ. मी. तसेच बाल्कनी क्षेत्र ४.७९ चौ. मी. तसेच एक कव्हर्ड कार पार्किंग नं. ५५ सह अशी फ्लॅट मिळकत. **सही/-**

दि. ०५/०४/२०२४

ॲड. चैतन्य रवींद्र जोशी
अपार्टमेंट नं. ०६, पहिला मजला, गजानन कृपा बिल्डिंग, नागनाथ पार, सदाशिव पेठ, पुणे -४११०३०.

जाहीर नोटीस

सर्व लोकांना कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत ही तिचे विद्यमान मालक **सोनल बी. परेरा,** रा. फ्लॅट नं. २०८, जुबिलेशन को-ऑप. हौसिंग सोसायटी, वाघोली, पुणे ४१२२०७ यांच्या स्वकष्टार्जित खरेदी मालकीची असून सदर मिळकत त्यांनी विक्रीस काढलेली असून सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी व बोजारहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकाने देवून सदरची मिळकत ही कायमखूष खरेदी देणेबाबतची बोलणी आमचे अशिलासोबत केलेली असून विसार रक्कम देखील स्वीकारलेली आहे. सदर मिळकतीवर विदयमान मालकां व्यतिरीक्त इतर कोणाचाही, कोणत्याही प्रकारे गहाण, दान, लिज, लिन, बक्षीस, साठेखत, विसारपावती, तारण, कर्ज, बोजा, करार, मदार, अन्न, वस्त्र, पोटगी व इत्यादी अगर अन्य कोणत्याही प्रकारचा कसलाही हक्क अधिकार अथवा हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून **८** दिवसांच्या आत मूळ कागदपत्रांसह आमच्याकडे प्रत्यक्ष येवून आमची खात्री पटवून द्यावी अन्यथा सदर मिळकत ही पूर्णपणे निर्वेध व निजोखमी आहे असे समजून, अगर कोणाचाही हक्क, अधिकार, हितसंबंध असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे असे समजून आमचे अशिल हे विद्यमान मालकासोबत सदर मिळकत ही निर्वेध व निजोखमी आहे असे समजून पुढील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील त्यानंतर कोणाचीही कसल्याही प्रकाराची तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट : तुकडी पुणे पोट तुकडी तालुका हवेली, मे. दुय्यम निबंधक सो., हवेली यांचे हद्दीतील आणि पुणे महानगरपालिका यांचे हद्दीतील गाव मौजे वाघोली येथील गट नं. ११३१ यांसी जुना गट नं. १६३७ या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या जुबिलेशन को-ऑप. हौसिंग सोसायटी या इमारतीमधील दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नं. २०८ यांसी कारपेट क्षेत्र ४४३ चौ.फुट व टेरेस क्षेत्र ५१ चौ. फुट ही फ्लॅट मिळकत. येणेप्रमाणे चतु:सिमापूर्वक मिळकत असे. **Sd/-**

पुणे, दि. ०२/०४/२०२४ **Sonal Pereira**

Adv. Nitin Nisargan
Add : S. No. 48/2, Ganesh Nagar, Wadgaonsheri, Pune- 411014 (Maharashtra) Mb. No. 9762179048

PUBLIC NOTICE

This is to inform the Public at Large that, **MR. DEENA DAYALAN K,** R/at Tower 1, Flat No. 703, Salapuria Sattva Divinity, Mysore Road, Nayanda Halli, Bengaluru-560039; is the owner of the flat (more particularly described in Schedule written hereunder & hereinafter referred to as the "Said Flat")

The said owner has decided to sell the said flat, and my client namely **Mr. SANGRAM SURESH KAKAD,** R/o. Shivdarshan, At post Jorve, Taluka Sangamner, District Ahmednagar desires to purchase the said flat from the said owner. And in such circumstances negotiations between the said owner and my client are in progress. The owner has assured and represented to my client that the said flat is free from all encumbrances, all claims, and reasonable doubts and he has a clear and marketable title to the Said Flat. Hence any person claiming any right, title or interest in the said flat, by way agreement to sell, lease, license, gift, maintenance, mortgage, charge, easement, lis-pendency, inheritance or any other claim of whatsoever nature, in the said flat, should intimate the same in writing with all available relevant documents as ownership of the flat with documentary proof thereof within **7 (Seven)** days of publication of this Notice, failing which all such claims, if any shall be deemed to have waived and abandoned and my client shall complete the transaction of purchase, without any reference thereto, and no claims shall be entertained thereafter.

SCHEDULE OF THE SAID FLAT :-

Flat No. 602, on Sixth floor, "D" Building, area admeasuring about Adv.Prajyot Ashok Gadhave.65 Sq.mtrs., (Carpet Area with Two Car Parking No. DB-23 and DB-24), together with exclusive right of the user of the open terrace at eye level admeasuring 11.08 Sq.mtrs. in the project known as "MARVEL GANGA FRIA Co-Op. Housing Society Limited" constructed and situated at land bearing Gat Nos. 1401, 1402/1, 1402/2, 1402/3, 1402/4, 1402/7, 1400, 1423 and 1424 situated, lying and being at Village Wagholi within the Registration Sub-District of Taluka and also within the limits of Jurisdiction of Sub-Registrar Haveli No. I to XXVII, Taluka- Haveli, District-Pune. Sd/-

Place: PUNE
Date: 06/04/2024

Adv. Prajyot Ashok Gadhave
Office Address :- A-10 Panse Chembar, Shivajinagar, Session and District Court, Pune - 411015 **Mob.-8600103522**

जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही **श्री. बाबाजी कृष्णा चव्हाण व सौ. भारती निलेश घुबे,** दोघेही रा. सर्व्हे नं. ६७, स्वामी विवेकानंद नगर, नवी सांगवी, पुणे ४११०२७ यांच्या मालकी हक्काची व ताबे वहिवाटीची असून त्यांनी सदर मिळकत आमचे अशिल **मे. टीम प्रॉपर्टीज तर्फे श्री. पराग वसंत राणे** यांना विकसित करण्यासंदर्भात बोलणी झालेली आहे. तसेच दि. ७-०९-२०२० रोजी सब रजिस्ट्रार हवेली क्र. १३, पुणे यांच्या कार्यालयात दस्त क्र. ७६३४/२०२० अन्वये विकसन करार करण्यासंदर्भात **मे. शशि कन्स्ट्रक्शन बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे प्रोप्रा. शशि लालजीभाई पटेल** यांना विकसित करण्यासाठी दिलेली होती. तथापि परिशिष्टात नमुद केलेली मिळकत मे. शशि कन्स्ट्रक्शन बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स यांच्यातर्फे अपूर्ण व अर्धवटरित्या बांधकाम करून अविकसित ठेवलेली आहे, त्या अनुषंगाने मूळ जागा मालक यांनी दि. ७-०३-२०२२ रोजी अपूर्ण असलेल्या बांधकामाबाबत कायदेशीर नोटीस पाठवून विकसन करारनाम्यातील अटी शर्ती भंग केल्याबाबत कळविलेले आहे. नोटीस प्राप्त होऊन अथवा माहिती असून देखील मे. शशि कन्स्ट्रक्शन बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे आजतागायत कोणतेही सदरचे मिळकतीचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत कोणतीही कृति झालेली नसल्यामुळे व सदर मिळकतीसंदर्भात केलेल्या विकसन करारनाम्याच्या अटी व शर्तीचा भंग झाल्यामुळे सदर मिळकत तिऱ्हाईत इसमास विकसित करण्याबाबत संपूर्ण अधिकार जागा मालक यांना आहे, असा भरवसा आमचे अशिल यांना दिलेला आहे. सदर मिळकतीमध्ये इतर कोणाचा हितसंबंध असल्यास त्यांनी त्या संबंधी कागदपत्रासहित माहिती सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून **१०** दिवसांचे आत आम्हास तसे लेखी कळवून व कागदपत्रानिशी खात्री पटवून द्यावी अन्यथा सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध व निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील मागाहून कोणाचीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन : अ) तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका हवेली मे. दुय्यम निबंधक हवेली पुणे यांचे कार्यक्षेत्रातील व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील गाव नवी सांगवी, पुणे येथील सर्व्हे नंबर ६७ हिस्सा नंबर १/१४ यांचा सिटी सर्व्हे नं. १८२९ यांसी एकूण क्षेत्र ०० हे ०३ आर पैकी विकसनासाठी देत असलेले क्षेत्र ०० हे. ०१ आर (एक आर) ही मिळकत यांसी चतु:सिमा खालीलप्रमाणे : **पुर्वेस :** श्री. मैड यांची मिळकत, **पश्चिमेस :** रस्ता व सनशाईन बिल्डींग, **दक्षिणेस :** श्री. भुरे यांची मिळकत, **उत्तरेस :** श्री. बाबाजी चव्हाण यांची मिळकत. **ब)** तुकडी पुणे, पोट तुकडी तालुका हवेली मे. दुय्यम निबंधक हवेली पुणे यांचे कार्यक्षेत्रातील व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीतील गाव मौजे नवी सांगवी, पुणे येथील सर्व्हे नंबर ६७ हिस्सा नंबर १/१४ यांचा सिटी सर्व्हे नं. १८२८, १८२९, १८३३ यांसी एकूण क्षेत्र ०० हे ०३ आर पैकी विकसनासाठी देत असलेले क्षेत्र ०० हे. ०.०५ आर (अर्धा आर) ही मिळकत यांसी चतु:सि